# मुंबई विद्यापीठ

**अत्यंत महत्वाचे**

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२.

Phone No. : 022 - 2261 89 87
022 - 2270 87 38
Email ID : supt.statunit@gmail.com

**No.UDSTAT/ICD/2018-19/ 114 of 2018**

**परिपत्रक :-**

विषय : **AISHE, MIS व मुंबई विद्यापीठाने विकसित केलेल्या विद्यार्थी संख्येबाबत (Students on Roll) कार्यशाळा.**

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई व पालघर यांचे सर्व प्राचार्य व संचालक यांचे लक्ष वरील विषयांकीत पत्राकडे वेधण्यात येत आहे की, सदर पत्रानुसार उपरोक्त जिल्हयातील महाविद्यालयामधील २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील AISHE, MIS व Student on Roll बाबत ऑनलाईन सर्व्हेक्षणाची सन २०१८-१९ची माहिती त्या त्या विहीत नमुन्यात पाठविण्याची विनंती करण्यात आली होती.

उपरोक्त ठिकाणी नमुद केलेल्या जिल्हयातील संबंधित संलग्नित महाविद्यालये/संस्था यांनी सन २०१८-१९ बाबतची माहिती त्वरीत अपलोड करण्याबाबत सूचना देण्यासाठी व माहिती अपलोड करताना येणा-या काही अडचणी दूर करण्याकरीता गुरुवार, दिनांक २० डिंसेबर, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२., येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. जिल्हा-निहाय संलग्नित महाविद्यालयांची माहिती पोर्टलवर ज्यांनी भरलेली असल्यास अथवा नसल्यास कार्यशाळेचे आयोजन केलेल्या दिनांकास सर्व संबंधितांनी सदर कार्यक्रमाच्या रुपरेषाविषयी माहिती व जानकारी करुन घेणे अत्यंत महत्वाचे असल्याकारणाने संबंधित कार्यशाळेकरीता आपल्या प्रतिनिधीची उपस्थिती अनिवार्य आहे, याची नोंद असावी.

संबंधित कार्यशाळेसाठी श्री. सागर भांदल, प्रोग्रामर, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, आणि मुंबई विद्यापीठाचे श्री. दिपक वि.मोरे, नोडल अधिकारी/अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, हे उपस्थित राहून त्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

तरी या संबंधित कार्यशाळेकरिता आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील नेमण्यात आलेले नोडल अधिकारी व डाटा एंण्ट्री ऑपरेटर यांना गुरुवार, दिनांक २० डिंसेबर, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२., येथे उपस्थित राहण्याचे आदेश दयावेत, ही विनंती.

14/12/18

उपकुलसचिव,
(जनसंपर्क/ सांख्यिकी कक्ष)

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १४ डिंसेबर, २०१८

---

**प्रत माहितीकरिता रवाना :-**

१) संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.
२) सहसंचालक, (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, एलफिस्टन तंत्रविद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.
३) स्विय सहायक, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
४) स्विय सहायक, प्र.कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
५) स्विय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.